REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

# नागेश संप्रदाय स्वरुप व साहित्यसंपदा : एक दृष्टिक्षेप

डॉ. तानाजी अं. देशमुख

मराठी विभागप्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.



## प्रस्तावना

मध्ययुगीन मराठी साहित्याचे मराठी साहित्याला महत्त्वाचे योगदान आहे. ह्या काळात विविध धर्मसंप्रदाय निर्माण झाले. ह्या संप्रदायाच्या अनुयायानी आपल्या धर्मसंप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी साहित्यनिर्मिती केली. यामुळे मराठी साहित्य समृध्द झाले. नाथ, वारकरी, महानुभाव, नागेश, दत्त , समर्थ, सूफी, वीरशैव असे अनेक संप्रदाय धर्मप्रसाराचे कार्य करीत राहिले यातून साहित्यनिर्मिती झाली.

### वडवाळसिध्द श्री नागेश -

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ (चंद्रमौळी) ह्या गावी हेग्रस नावाचे भारद्वाज गोत्री सात्विक वृत्तीचे ब्राह्मण राहात होते. बालवयात पितृछत्र हरपल्याने त्यांच्या माता सुमतीने त्यांना अध्यात्म, धार्मिक, सदाचाराचे संस्कार दिले.पुढे हेग्रस यांनी आत्मकल्याणासाठी मातेच्या पायावर डोके ठेवून , माहुरगडावर देवीच्या आशीर्वादासाठी १२ वर्षे आराधना केली. देवी प्रसन्न झाली,

मानुनी मातृआज्ञा प्रमाण । माहुरगड पातला ।
थे अनुष्ठानासी बैसला । महाविद्या उपासिला ।
द्वादश वर्षे तपिन्नला । परि न हो सुमुख ।
तव भक्त हेग्रस केले निर्वाण । तेणे जगदंबा जाहली प्रसन्न ।[1]

देवी प्रसन्न होऊन म्हणाली 'तव वदली रेणुका माता । हस्तिनापुरा जावे आता ।' हस्तिनापूर हेग्रस यांना माहीत नसल्याचे त्यांनी देवीस सांगितले. नंतर मातेने त्यांना मानस सरोवराकाठी नेले. आणि येथे तुझे दिक्षागुरु येथील असे सांगितले. लाकडी घोडयावर बसून आलेल्या गुरुनी हेग्रसचे गुरुत्त्व स्वीकारले. हेग्रस यांनी गुरुनी आपल्या गावी येऊन, मम सुमती माता सती बाला । तिये दर्शन द्यावया । । अशी विनंती केली. हेग्रसच्या विनंतीला मान देऊन सदगुरु व हेग्रस ह्या दोघांनी दिल्ली ते मोहाळ असा प्रवास सुरु केला. वाटेत दिल्ली येथे शेख नसरुद्दीन बादशाचे गुरुत्त्व पत्करले, केंदूर येथे अनेक शिष्यजन मिळाले . श्रींच्या प्रवासात त्यांच्या अंगावर अनेक नाग होते, म्हणून त्यांचे नागांचे ईश- नागेश, किंवा नागांचे नाथ- नागनाथ हे नाव प्रसिध्द झाले. बीड जिल्ह्यातील मानुर जवळील नागतळे ह्या ठिकाणी त्यांनी वास्तव केले. पुढे मोहोळ येथे एका चिंचेच्या झाडाखाली थांबले. गावातील लोकांच्या त्रासाला कंटाळून नागनाथ हे हेग्रस व अन्य भक्तगणांना घेऊन अरण्यात आले. तेथे वठलेल्या झाडाखाली बसले. झाडाला शिष्याकरवी पाणी घातले. लगेचच त्या वठलेल्या झाडाला पालवी फुटली,

वाळले वृक्षाचिये तळी । आसन घाळूनी आळुमळी ।
बैसले तया तत्काळी । पल्लव लाखोळी फुटली की ।[2]

श्री नागनाथांनी वाळलेल्या वडला पालवी फुटविली म्हणून 'वडवाळ' हे नांव ह्या नगरीला प्राप्त झाले. येथील सिध्दपुरुष म्हणून 'वडवाळसिध्द नागनाथ' हे नांव उदयाला आले.

---

[1] मोहोळकर विनायक, श्री क्षेत्र वडवाळ नागनाथ दर्शन, प्रथम आवृत्ती २०१३, पृ.५.

[2] मोहोळकर विनायक, श्री क्षेत्र वडवाळ नागनाथ दर्शन, प्रथम आवृत्ती २०१३, पृ.१०

LBP PUBLICATION

## वडवाळसिध्द श्री नागेश संप्रदायाचे आचारधर्म

नागेश संप्रदाय हा योग साधनेला महत्त्व देणारा, शिवदैवत पूज्यनीय असणारा, अद्वैत शुध्द वेदांतावर आधारीत इतर संप्रदायाशी समन्वय साधून भक्ती मार्गाचा पुरस्कार करणारा संप्रदाय आहे.'जातियवाद ह्या संप्रदायात मान्य नाही. ह्या संप्रदायात विशिष्ठ प्रकारचे व्रत, पोषाख, पताका, माळ असे कांही नाही. मद्य, मांस, निंदा द्यूत, व्याभिचार इत्यादीपासून निवृत्ती असलेल्या ह्या संप्रदायास गुरुकृपा अभिप्रेत आहे. महाशिवरात्रीचे महत्त्व ह्या संप्रदायात विशेषत्त्वे करून आहे.'[3] ह्या संप्रदायात नागेश उपासना निर्गुणोपासनेकडे नेणारा मार्ग आहे, म्हणून महत्त्वाची मानली जाते.

## नागेशांची स्मृतीस्थाने व तीर्थक्षेत्रे

महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात श्री नागेश संप्रदायाचे कार्यक्षेत्र विस्तारलेले असून ह्या दोन राज्यात आजही हा संप्रदाय अध्यात्मिक कार्य करीत आहे. महाराष्ट्रातील मानूर, देगांव, मोहोळ, वडवाळ, मार्डी, केंदूर, पाबळ, कान्हुरमेसाई आणि निमगांव ही नागेशांच्या सहवासाने पुनीत झालेली स्मृतिस्थाने आहेत.[४] मानूर, किल्लारी हे गांव बीड जिल्हयात आहे. देगांव, मोहोळ, वडवाळ आणि मार्डी हे गांवे सोलापूर जिल्हयातील असून, नरंदे आणि आळते ही कोल्हापूर जिल्हयातील आहेत. केंदूर, पाबळ, कान्हूर मेसाई, निमगांव, कन्हेरसर ही तीर्थक्षेत्रे पुणे जिल्ह्यातील आहेत. तसेच जाजनमुगळी आणि महागांव हे कर्नाटकातील ह्या संप्रदायाची महत्त्वाची क्रेद्रस्थाने आहेत.

## नागेश संप्रदाय आणि इतर संप्रदाय

मध्ययुगीन कालखंडात नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ , नागेश संप्रदाय निर्माण झाले. आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान प्रसाराचे कार्य सर्वच संप्रदायानी केले. एका संप्रदायाचा प्रभाव दुस-या संप्रदायावर काही प्रमाणात पडल्याचे लक्षात येते. इतर धर्मातील जनकल्याणकारी कांही विचार सर्व संप्रदायानी स्वीकारलेले दिसतात.

वीरशैव संप्रदायाप्रमाणे हा संप्रदाय शिवपूजक आहे. मन्मथ स्वामी सारखे शिष्य नागेश संप्रदायात आहेत. मोहोळ येथे हेग्रसांना श्री नागेशांनी फकीर वेषात दर्शन दिलेले आहे. दिल्ली येथे शेख नसरुद्दीन यास पैगंबर रुपात दर्शन दिले आहे. नसरुद्दीन, आलमखान हे श्री नागेश संप्रदायाचे भक्त आहेत आजही मोहोळ येथील उत्सवात मशिदीजवळ हिंदु-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून कानात बोटे घातली जातात. वारकरी संप्रदायाचा प्रभाव या संप्रदायवर आहे. संप्रदायातील भक्तांना बुका लावाला जातो. वारकरी संप्रदायातील चक्री भजनाप्रमाणे ह्या संप्रदायात चक्री भजन म्हंटले जाते.[५]

## नागेश संप्रदायाची साहित्यसंपदा

मध्ययुगीन काळात महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा प्रदेशात उदयास आलेला नागेश संप्रदाय होय. याच ठिकाणी संप्रदायाला विकसित स्वरूप निर्माण झाले. नागेश संप्रदायाचे प्रवर्तक श्री नागेश हे सिध्द पुरुष बाराव्या शतकामध्ये होऊन गेले. ह्यांचे कार्यक्षेत्र मानससरोवरापासून ते वडवाळपर्यंत दिसून येथे. नागेश संप्रदाय हा स्वतंत्र संप्रदाय आहे. महाराष्ट्रातील इतर संप्रदायाप्रमाणे या संप्रदायाच्या अनुयायांनी साहित्यनिर्मिती केली आहे. या संप्रदायातील भक्तांची अखंड परंपरा असून त्यांनी श्री नागेश सिध्दपुरूषांनी केलेल्या लीला व दिलेली शिकवण यांचे रसाळ वर्णन साहित्यातून केले आहे. हे साहित्य आध्यात्म आणि वाड्.मयीन गुणांनी समृध्द आहे. या संप्रदायातील प्रमुख संतकवी श्री अज्ञानसिध्द यांनी वरदनागेश या ग्रंथात संप्रदायाची भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणतात,

मग चरणावरूनि उठविला । स्वस्थान बैसविला ।
उपदेश क्रम दाविला । विधीयुक्त मार्ग ॥
वरद नागेश आपुली संप्रदायाची विधी । करुनि स्थिरावला सुख समाधी ।
तेथे अज्ञानशक्तिचा बुत्धी । नास्ति जाहल्या ॥[६]

---

3 नागेशदर्पण, संपा. मोहोळकर विनायक, नागेश प्रकाशन, सोलापूर, प्रथम आवृत्ती १९९१, पृ. ६६

4 महादेव हरि, कान्हूराज महाराज चरित्र, प्रथम आवृत्ती १९९७ पृ.६.

5 नागेशदर्पण, संपा. मोहोळकर विनायक, नागेश प्रकाशन, सोलापूर, प्रथम आवृत्ती १९९१, पृ. २५

6 महादेव हरि, कान्हूराज महाराज चरित्र, प्रथम आवृत्ती १९९७ पृ.३

यावरुन या संप्रदायाचे अस्तित्व स्वतंत्रपणे आहे. स्वतंत्र अस्तित्व असणा-या या संप्रदायाचे साहित्य आशयसंपन्न आहे.

या संप्रदायाच्या मांनूर गावचे एकलिंग तेली यांनी 'आत्मसार' हा ग्रंथ व कांही अंभग आरत्या लिहिल्या आहेत. बहिंरभट हे पैठणचे ब्राह्मण होते. हे पुढे श्री नागेशच्या सानिध्यात आल्यानंतर बहिरा जातवेद झाले. त्यांचा 'भैरवी टीका' हा ग्रंथ प्रसिध्द असून व त्यांनी पोवाडा, अभंग लिहिले आहेत. हेग्रसाच्या मुलीचा मुलगा असलेल्या श्री अज्ञानसिध्द यांनी 'संकटहरणी', 'नागेश माहात्म्य', 'पंचीकरण प्रमेय', 'कालज्ञान', 'वरद नागेश', 'देवकी माहात्म्य', 'सप्टकोटेश माहात्म्य', 'स्वरूप निर्वाण', 'श्री गुरु साम्राज्य', 'जीवब्रम्हा भेद लक्षण', 'अकलकांड', 'पृच्छापत्र', इतर स्फुट काव्ये, तसेच 'अभंग', 'साक्या', 'आरत्या', 'फाकी', असे विपुल ग्रंथ रचना केली आहे. भुजंगबुवा याचे काही 'अभंग' प्रसिध्द आहेत. दत्तचैतन्य हे अज्ञानसिध्दांचे शिष्य होते. त्यांनी 'अभंग' रचना केली आहे. आलमखान हे पठाण समाजाचे नागेश भक्त होते. त्यांनी उपदेशपर 'पद' रचना केली आहे. श्री नागनाथांचे समकालीन असलेले बोलेराम हे देगांव येथील ब्राह्मण होते. त्यांनी 'अभंग' व 'आरत्या' लिहिल्या आहेत. सिध्दलिंगबुवा हे हेग्रसाच्या वंशातील असून त्यांनी कांही 'पदे' लिहिली आहेत. नागोजी बुवा हे सिध्दलिंगबुवाचे पुत्र होते. त्यांनी कांही उपदेशपर व अध्यात्मपर 'पदे' लिहिली आहेत. चंवडा हे सिध्दलिंगबुवा यांचे शिष्य असून त्यांनी 'श्री नागेश चरित्र' हा ग्रंथ व कांही 'अभंग' लिहिले आहेत. अवधूत हे देगांव येथे राहणारे सोनार समाजाचे होते. त्यांनी कांही अभंग रचना केली असून ती मराठी व हिंदी भाषेतून आहे. नरहरबुवा हे हेग्रस वंशातील होते. त्यांनी 'सिध्दांत रत्नाकर' नावाचा ४४१९ ओव्यांचा ग्रंथ लिहिला आहे.

रघुनाथबुवा यांच्या परंपरेने चालत असलेला मठ किल्लारी येथे आहे. यांनी श्री नागेश संप्रदायात ' चक्री भजन' रचले. यानंतर शकरबुवा, अम्मा, विश्वनाथ खर्गे, रामदास आंडगे आणि नागाबुवा कुर्डे यांनी ही चक्री भजनाची परंपरा सुरु ठेवली आहे.

मध्ययुगीन काळात निर्माण झालेल्या या नागेश संप्रदायात अभंग, आरती, पोवाडे, लावणी, साकी, फाकी अशा विविध रचनाबंधातून लेखन झालेले आहे. मुख्यतः या संत कवीची रचना आध्यात्मिक स्वरुपाची असून देशी रचनाबंधाशी संबंधित आहे. हे देशी रचनाबंध शेकडो वर्षापासून लोकजीवनाशी, लोकसंस्कृतीशी, लोकगीतांशी निगडित आहेत. ते लोकाभिरुचीने घडविलेले व वाढविलेले आहेत. भावमयता, भक्तीप्रवणता, सुबोधता, लयबध्दता, गेयता, लोकसंगीतानुकुलता, परिणामकारकता इत्यादी गुणांमुळे ते थेट लोकमनाशी भिडतात. या साहित्याच्या अभ्यासाने नागेश संप्रदायाचे सांप्रदायीक महत्त्व व मराठी साहित्यातील योगदान स्पष्ठ होईल.

या संप्रदायातील संतकवींनी आपल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान, शिव माहात्म्य, सिध्दीचे मार्ग, उत्त्कट गुरुनिष्ठा, वर्णलेली आहे. उध्दवचिध्दन यांचे 'बहिरंभट चरित्र', 'नागनाथ चरित्र', चवंडा यांचे 'नागनाथ चरित्र', अनंत बल्लाळ यांचे 'नागेश चरित्र', 'बहिरंभट चरित्र', नरहरबुवा यांचे 'नागेश चरित्र', 'सिध्दांत रत्नाकर', भानाजी त्रिंबक यांचे 'नागेशलीलामृत', महादेव हरि ऊर्फ राजाभाऊ राजपाठक संपादित 'कान्हुराज महाराज चरित्र', डॉ. शे. द. पसारकर यांचे 'श्री मन्मथ चरित्रामृत' श्री विनायक मोहोळकर यांचा 'पूर्णब्रह्मदर्शन', 'श्री वडवाळ सिध्द नागेश चरित्र आणि श्री अज्ञानसिध्द कृत स्वरुप निर्वाण व प्रच्छापत्र' हे चरित्रात्मक ग्रथ उपलब्ध आहेत.

नागेश संप्रदायाचे आराद्य दैवत नागनाथ आहेत. या नागनाथांची चरित्र अनेक संतानी लिहिली आहेत. ही चरित्रे म्हणजे धार्मिक , अध्यामिक व चरित्रात्मक इतिहास आहे. या चरित्रग्रंथात नागनाथांची जीवनकथा सांगितलेली आहे. या चरित्रग्रथाचे स्वरुप दुहेरी आहे. नागनाथांच्या जीवनातील घटना- प्रसंग, त्यांची आशयासूत्रानुसार केलेली निवड, व्यक्तिरेखाटन, निवेदन शैली यासारख्या घटकांमुळे दुस-या अंगाने या चरित्राला साहित्यरूप प्राप्त झाले आहे. साहित्यकृती म्हणून या चरित्रात नागनाथांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा कालखंड, त्यांचे सांप्रदायीक क्षेत्रातील कार्य यांचा तोल सभाळला आहे.

'श्री नागेश चरित्र व श्रीअज्ञानसिध्दकृत स्वरुपनिर्वाण पृच्छापत्र ' हा ग्रथ श्री विनायक शंकरराव मोहोळकर यांनी सन १९९४ साली संपादीत केला आहे. ह्या संपादीत ग्रंथात श्रीअज्ञानसिध्द विरचित श्री नागेश चरित्र, श्री चवंडाकृत श्री नागेश चरित्र, श्री अनंत बल्लाळकृत श्री सिध्द हेग्रस चरित्र, श्री. उध्दव चिद्घनकृत हेग्रस चरित्र, श्री नरहरबुवाकृत श्री नागेश चरित्र अशाप्रकारे श्री नागेशांची चार आणि श्री हेग्रसांची दोन चरित्र संकलीत केली आहेत. याशिवाय ह्या ग्रंथात श्री संत अज्ञानसिध्दकृत स्वरुप निर्वाण व प्रच्छापत्र संपादीत केले आहे.

ही चरित्रे श्री नागेश व श्री हेग्रस यांच्याविषयी असलेल्या भक्तीभाव आहे. कोणत्याही व्यक्तिंच्या अथवा संप्रदायाच्या थोर कार्याच्या नोंदी व स्मृती विखुरलेल्या असल्याने काळाच्या पडद्याआड लुप्त होत जाण्याची शक्यता असते. त्यामुळे नागेश संप्रदायाची माहिती व संदर्भसाधने उपलब्ध करण्यासाठी श्री हेग्रस यांच्या एकविसाव्या पिढीचे प्रतिनिधित्त्व करणा-या श्री विनायक मोहोळकर यांनी प्रचंड पायपीठ केली. या चरित्रग्रंथामुळे संप्रदायाचे आचारधर्म, संतपरंपरा, त्यांच्या

कार्याच्या नोंदी, त्यांच्या स्मृती यांना अस्सलता, विश्वसनीयता, सप्रमाणता व जिवंतपणाचे परिमाण प्राप्त झाले आहेत. या चरित्र ग्रंथाच्या अभ्यासाने मराठी साहित्यात नविन अध्यात्मिक साहित्याची भर पडणार आहे.

'नागेशदर्पण' हा विनायक शं. मोहोळकर यांनी अथक परिश्रमपूर्वक सन १९९१ साली संपादीत केलेला ४१७ पृष्ठांचा ग्रंथ आहे. प्रथम १ ते ७० पृष्ठात नागेश संप्रदायाचे आचार व पूर्वइतिहास लिहिला असून पुढील ३६ पृष्ठात नागेश चरित्र आहे. या ग्रंथात नागेश संप्रदायातील ३२ संताच्या अभंगाचा समावेश केला आहे. यामध्ये प्रामुख्याने श्री अज्ञानसिध्द - १६९, श्री. बोलराम - १, श्री. बहिरंभट -५, श्री. चैतन्यदत्त - ६, श्री आलमखान - ३२ ,श्री. भुजंगबुवा - ४, श्री. सिध्दलिंगबुवा- १३, श्री. चवंडा- २, श्री. नागोजीबुआ- ६, श्री शिवरामबुवा- ९, श्री. मध्वनाथ- ६, श्री. उध्दवचिध्दन- ४, श्री. मन्मथ स्वामी-१, श्री. केशव चैतन्य- २, श्री निरंजनपुरी- ६, श्री. अवधूत- १९, श्री. रेवणसिध्द-१, श्री. बसवलिंग-२, श्री. बसवेश्वर- १, श्री. जमाल फकीर-१, श्री. सिध्दराम-१, श्री. बानाजीनाथ-१, श्री. नारायण- ४, श्री. नरोबा- २, श्री. श्रीधर- २, श्री. भुजंग- १, श्री. लिंबनाथ- २, श्री. लिंगेश्वर- २, श्री शिवराम ऊर्फ रावजी-२३, श्री. गुरुदास-१, श्री. मारुतीबुवा-१, श्री नरहरबुवा-४, अशा ३२ संतांचे अभंग आलेले आहेत. ह्या शिवाय ह्या ग्रंथात श्री रघुनाथबुवा यांची चक्री भजन-१५ , आरती, नमस्कार, फांकी, साकी-३९, इत्यादी रचना व विविध संतांच्या सुमारे ५० आरत्या संग्रहीत केल्या आहेत. या ग्रंथामुळे आपणांस नागेश संप्रदायाची ओळख होते.

मध्ययुगीन मराठी सांप्रदायिक साहित्याचा अभ्यास , संशोधन, तत्त्वज्ञान आणि वाङ्.मय ह्या दृष्टिने महत्त्वाचे मानले जाते. श्री नागेश संप्रदायाच्या साहित्यातून संप्रदायाची समग्र माहिती उपलब्ध होत आहे. नागेशांचे अवतार कार्य, शिष्य परंपरा, संप्रदाय विवरण पंथीय तत्त्वज्ञान , आचारधर्म इत्यादी विषय अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. या साहित्याचा एकत्रित अभ्यास करणे आवश्यक असून मराठी साहित्याला आध्यात्मिक योगदान मिळणार आहे. हे साहित्य समाज, साहित्य आणि संस्कृती या दृष्टिने महत्त्वाचे ठरणार आहे.

LBP PUBLICATION